रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1] | नई दिल्ली, नवंबर 12-18, 2020/21-27, कार्तिक (शक) 1942 | [खंड 19 |
| No. 1 ] | NEW DELHI, NOVEMBER 12-18, 2020/21-27, KARTIK (SAKA) 1942 | [Vol. 19 |
| अं. १] | नवी दिल्ली, नोव्हेंबर १२-१८, २०२०/२१-२७, कार्तिक (शके) १९४२ | [खंड १९ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मुसलमान वेक्फ एक्ट, 1923, (2) दि इंडस्ट्रियल डिस्प्युटस् (बैकींग अॅण्ड इन्स्युरन्स कंपनीज्) एक्ट, 1949, (3) दि अॅडव्होकेट'स् वेल्फेअर फण्ड एक्ट, 2001, (4) दि प्रोटेक्शन ऑफ वूमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स एक्ट, 2005, (5) दि कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राईटस् एक्ट, 2005, (6) दि नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनल एक्ट, 2010 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड़ (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Mussalman Wakf Act, 1923, (2) The Industrial Disputes (Banking and Insurance Companies) Act, 1949, (3) The Advocates' Welfare Fund Act, 2001, (4) The Protection of Women from Domestic Violence Act, 2005, (5) The Commissions for Protection of Child Rights Act, 2005, (6) The National Green Tribunal Act, 2010 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मुसलमान वक्फ अ‍ॅक्ट, १९२३, (२) दि इंडस्ट्रियल डिस्प्युटस् (बँकिंग अ‍ॅण्ड इन्श्युरन्स कंपनीज्) अ‍ॅक्ट, १९४९, (३) दि अ‍ॅडव्होकेटस्' वेल्फेअर फंड अ‍ॅक्ट, २००१, (४) दि प्रोटेक्शन ऑफ वूमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स अ‍ॅक्ट, २००५, (५) दि कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राईटस् अ‍ॅक्ट, २००५, (६) दि नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनल अ‍ॅक्ट, २०१० यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५

## (२००५ चा अधिनियम क्रमांक ४३)

[ ५ जुलै, २०१९ रोजी यथाविद्यमान ]

[ १३ सप्टेंबर, २००५.]

**कुटुंबात घडणाऱ्या कोणत्याही स्वरूपाच्या हिंसाचारास बळी पडणाऱ्या महिलांच्या, संविधानाने हमी दिलेल्या हक्कांचे अधिक प्रभावीपणे संरक्षण करण्याची आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक अशा बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी संसदेकडून तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[१] अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(क) "पीडित व्यक्ती" याचा अर्थ, जिचा उत्तरवादीबरोबर कौटुंबिक नातेसंबंध असेल किंवा राहिला असेल अशी आणि उत्तरवादीकडून जिच्या बाबतीत कोणतीही कौटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोप करणारी कोणतीही महिला, असा आहे ;

(ख) "मूल" याचा अर्थ, अठरा वर्षे वयाखालील कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यात कोणतेही दत्तक, सावत्र आणि वाढवलेले मूल अंतर्भूत होते ;

(ग) "भरपाई आदेश" याचा अर्थ, कलम २२ अनुसार देण्यात आलेला आदेश, असा आहे ;

(घ) "ताबा देण्याबाबतचा आदेश" याचा अर्थ, कलम २१ अनुसार देण्यात आलेला आदेश, असा आहे;

(ङ) "कौटुंबिक घटना अहवाल" याचा अर्थ, पीडित व्यक्तीकडून कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार मिळाल्यानंतर विहित नमुन्यात तयार केलेला अहवाल, असा आहे ;

(च) "कौटुंबिक नातेसंबंध" याचा अर्थ, जेव्हा दोन व्यक्ती रक्तसंबंधाने, विवाहाद्वारे किंवा विवाहसदृश नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधाद्वारे सामायिक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील, किंवा संयुक्त कुटुंब म्हणून एकत्र राहणाऱ्या कुटुंबाचे सदस्य असतील अशा दोन व्यक्तींमधील नातेसंबंध, असा आहे ;

(छ) "कौटुंबिक हिंसाचार" याचा अर्थ, कलम ३ मध्ये त्याला जो अर्थ नेमून दिलेला आहे, तोच असेल ;

१९६१ चा १८. (ज) "हुंडा" याचा अर्थ, हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१ याच्या कलम २ मध्ये त्याला जो अर्थ नेमून दिलेला आहे, तोच असेल ;

(झ) "दंडाधिकारी" याचा अर्थ, जेथे पीडित व्यक्ती तात्पुरती किंवा अन्य प्रकारे राहत असेल किंवा उत्तरवादी राहत असेल किंवा जेथे कौटुंबिक हिंसाचार घडला असल्याचा आरोप करण्यात आला असेल अशा क्षेत्रात, फौजदारी प्रक्रिया
१९७४ चा २. संहिता, १९७३ अन्वये, अधिकारितेचा वापर करणारा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, किंवा, यथास्थिति, महानगर दंडाधिकारी, असा आहे ;

(ञ) "वैद्यकीय सुविधा" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनाने, वैद्यकीय सुविधा म्हणून अधिसूचित केलेली सुविधा, असा आहे ;

---

१. पहा अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश १७७६ (ङ), दिनांक १७-१०-२००६. पहा **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), दिनांक २६-१०-२००६.

(ट) " आर्थिक अनुतोष " याचा अर्थ, कौटुंबिक हिंसाचारामुळे पीडित व्यक्तीला करावा लागलेला खर्च आणि झालेले नुकसान यांची भरपाई करण्यासाठी, या अधिनियमाअन्वये कोणत्याही अनुतोषाची मागणी करण्याविषयीच्या अर्जावरील, सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यात, दंडाधिकारी, उत्तरवादीने पीडित व्यक्तीला नुकसानभरपाई द्यावी असा आदेश देईल अशी नुकसानभरपाई, असा आहे ;

(ठ) " अधिसूचना " याचा अर्थ, **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना, असा आहे आणि " अधिसूचित" या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ त्यानुसार लावला जाईल ;

(ड) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ढ) " संरक्षण अधिकारी " याचा अर्थ, राज्य शासनाकडून कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी, असा आहे ;

(ण) " संरक्षण आदेश " याचा अर्थ, कलम १८ अनुसार देण्यात आलेला आदेश, असा आहे ;

(त) " निवासाबाबतचा आदेश " याचा अर्थ, कलम १९ च्या पोट-कलम (१) अनुसार देण्यात आलेला आदेश,असा आहे ;

(थ) " उत्तरवादी " याचा अर्थ, जिचा पीडित व्यक्तीशी कौटुंबिक नातेसंबंध आहे किंवा राहिला आहे आणि पीडित व्यक्तीने जिच्या विरोधात या अधिनियमाअन्वये कोणताही अनुतोष मागितला आहे अशी कोणतीही सज्ञान पुरूष व्यक्ती, असा आहे :

परंतु असे की, पीडित पत्नी किंवा विवाहसदृश नातेसंबंधात राहणारी महिला, तिच्या पतीच्या किंवा पुरूष जोडीदाराच्या नातेवाईकाविरुद्ध सुद्धा तक्रार दाखल करू शकेल;

(द) " सेवा प्रदाता " याचा अर्थ, कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये नोंदवण्यात आलेली संस्था, असा आहे;

(ध) " सामाईक घर " याचा अर्थ, जेथे पीडित व्यक्ती, कौटुंबिक नातेसंबंधात एकटीच किंवा उत्तरवादीबरोबर राहत असेल किंवा कोणत्याही टप्प्यात राहिली असेल असे घर, असा आहे आणि त्यात पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी यांची संयुक्तरीत्या मालकी किंवा भाडेदारी तत्त्वावर असलेले किंवा ज्याच्या संबंधात पीडित व्यक्तीचा किंवा उत्तरवादीचा किंवा त्या दोहोंचा संयुक्तपणे किंवा एकट्याने कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा समान अधिकार असेल अशा त्या दोघांपैकी कोणाही एकाची मालकी किंवा भाडेदारी तत्त्वावर असलेल्या घराचा समावेश असेल आणि त्यामध्ये, उत्तरवादी ज्याचा सदस्य आहे अशा संयुक्त कुटुंबाच्या मालकीचे असेल अशा घराचा, त्या सामाईक घरामध्ये उत्तरवादीचा किंवा पीडित व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असो अगर नसो, समावेश असेल ;

(न) " आश्रय गृह " याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनाने आश्रय गृह म्हणून अधिसूचित केलेले कोणतेही आश्रय गृह, असा आहे.

## प्रकरण दोन

## कौटुंबिक हिंसाचार

**कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या.**

**३.** या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, उत्तरवादीचे कोणतेही कृत्य, अकृती किंवा कृती किंवा आचरण ही, जर त्यामुळे—

(क) पीडित व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षितता, जीवित, अवयव किंवा मानसिक वा शारीरिक स्वास्थ्य यांना हानी किंवा क्षती किंवा धोका पोहोचत असेल किंवा तसे करण्याकडे त्याचा कल असेल आणि त्यामध्ये शारीरिक दुर्व्यवहार, लैंगिक दुर्व्यवहार, शाब्दिक व भावनिक दुर्व्यवहार आणि आर्थिक दुर्व्यवहार घडवून आणण्याचा समावेश होत असेल; किंवा

(ख) कोणताही हुंडा किंवा इतर मालमत्ता किंवा किंमती दस्तऐवज यांच्या कोणत्याही बेकायदेशीर मागणीची पूर्तता करण्यासाठी पीडित व्यक्तीवर किंवा तिच्याशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तीवर जबरदस्ती करण्याच्या दृष्टीने पीडित व्यक्तीचा छळ, हानी होत असेल, तिला क्षती किंवा धोका पोहचत असेल ; किंवा

(ग) ज्याचे पर्यवसान, खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये उल्लेखित कोणत्याही आचरणाद्वारे पीडित व्यक्तीस किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीस धमकावण्यामध्ये होत असेल ; किंवा

(घ) पीडित व्यक्तीस अन्य प्रकारे शारीरिक किंवा मानसिक अशा कोणत्याही प्रकारची क्षती किंवा हानी पोहचत असेल ;

तर, ते आचरण कौटुंबिक हिंसाचार ठरेल.

**स्पष्टीकरण एक.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) " शारीरिक दुर्व्यवहार " याचा अर्थ, पीडित व्यक्तीस शारीरिक यातना, हानी पोहोचविण्यास, किंवा जीवित, अवयव किंवा आरोग्य यांना धोका पोहोचविण्यास किंवा आरोग्य किंवा विकास यांना हानी पोहोचविण्यास कारणीभूत ठरेल अशा स्वरूपाचे कोणतेही कृत्य किंवा आचरण, असा आहे आणि त्यामध्ये हमला, अपराधिक धाकदपटशा किंवा अपराधिक बळजबरी यांचा समावेश होतो ;

(दोन) " लैंगिक दुर्व्यवहार " यामध्ये ज्यामुळे स्त्रीच्या प्रतिष्ठेचा अवमान होतो, अवहेलना होते किंवा कमीपणा येतो वा अन्य प्रकारे, तिचा मानभंग होतो असे लैंगिक स्वरूपाचे कोणतेही आचरण, याचा समावेश होतो;

(तीन) " शाब्दिक आणि भावनिक दुर्व्यवहार " यामध्ये—

(क) अवमान, कुचेष्टा, अवहेलना, अपशब्द वापरणे आणि विशेषतः मूल होत नसल्याच्या किंवा मुलगा नसल्याच्या कारणावरून अपमान किंवा कुचेष्टा करणे ; आणि

(ख) पीडित व्यक्तीचे हितसंबंध असलेल्या एखाद्या व्यक्तीस, शारीरिक पीडा पोहचवण्याची वारंवार धमकी देणे,

यांचा समावेश होतो;

(चार) " आर्थिक दुर्व्यवहार " यामध्ये—

(क) पीडित व्यक्ती, कोणत्याही कायद्यान्वये किंवा रूढीनुसार ज्यास हक्कदार असेल अशा, मग ती न्यायालयाच्या आदेशानुसार किंवा अन्यथा देय असो किंवा कसे किंवा पीडित व्यक्तीस, गरजेपोटी तसेच पीडित व्यक्ती व असल्यास तिची मुले यांच्या घरगुती गरजांसाठी, परंतु त्या गरजांपुरतीच मर्यादित नव्हे तर, आवश्यक असेल अशी सर्व किंवा कोणतीही आर्थिक किंवा वित्तीय साधनसंपत्ती, स्त्रीधन, पीडित व्यक्तीची संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे मालकी असणारी मालमत्ता, सामाईक घरांच्या संबंधातील भाड्याचे प्रदान आणि निर्वाह खर्च यांपासून वंचित करणे ;

(ख) घरसंसारातील चीजवस्तूची विल्हेवाट, स्थावर किंवा जंगम मत्ता, मौल्यवान चीजवस्तू, शेअर्स, रोखे, बंधपत्रे व अन्य तत्सम बाबी किंवा पीडित व्यक्तीचा ज्यामध्ये हितसंबंध आहे किंवा कौटुंबिक नातेसंबंधामुळे ज्याचा वापर करण्यास ती हक्कदार आहे किंवा पीडित व्यक्तीला किंवा तिच्या मुलांना ज्याची वाजवी गरज आहे अशी अन्य मालमत्ता, किंवा तिचे स्त्रीधन, किंवा पीडित व्यक्तीने संयुक्तपणे वा स्वतंत्रपणे धारण केलेली अन्य कोणतीही मालमत्ता यांचे कोणतेही अन्यसंक्रामण करणे ; आणि

(ग) पीडित व्यक्ती कौटुंबिक नातेसंबंधामुळे ज्यांचा वापर करण्यास किंवा लाभ घेण्यास हक्कदार आहे अशी साधनसंपत्ती किंवा सुविधा, तसेच सामाईक घरातील प्रवेशाचा हक्क, कायम उपलब्ध असण्यास मनाई करणे किंवा निर्बंध घालणे,

यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण दोन.—** उत्तरवादीचे कोणतेही कृत्य, अकृती, कृती किंवा आचरण हे या कलमान्वये " कौटुंबिक हिंसाचार " या सदरात मोडते किंवा कसे हे निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, या बाबीतील एकूण वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेतली जाईल.

## प्रकरण तीन

## संरक्षण अधिकारी, सेवा प्रदाता, इत्यादींचे अधिकार आणि कर्तव्ये

**संरक्षण अधिकाऱ्यास माहिती देणे आणि माहिती देणाऱ्यावर कोणतेही दायित्व नसणे.**

४. (१) कौटुंबिक हिंसाचाराची कृती घडली आहे किंवा घडत आहे, किंवा घडण्याची शक्यता आहे, असे कोणत्याही व्यक्तीस सकारण वाटत असल्यास, तिला त्यासंबंधीची माहिती संबंधित संरक्षण अधिकाऱ्यास देता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी, सद्भावपूर्वक माहिती देण्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर, दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाचे, दायित्व ओढवणार नाही.

पोलीस अधिकारी, सेवा प्रदाता आणि दंडाधिकारी यांची कर्तव्ये.

५. कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार ज्याच्याकडे प्राप्त झालेली असेल किंवा अन्यथा कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनास्थळी जो उपस्थित असेल असा किंवा कौटुंबिक हिंसाचाराची घटना त्याला कळविण्यात येईल तेव्हा तो पोलीस अधिकारी, संरक्षण अधिकारी, सेवा प्रदाता किंवा दंडाधिकारी पीडित व्यक्तीला,—

(क) या अधिनियमाअन्वये काढावयाचे संरक्षण आदेश, आर्थिक अनुतोषाचा आदेश, ताबा देण्याबाबतचा आदेश, निवासाबाबतचा आदेश, नुकसानभरपाई आदेश यांद्वारे, किंवा यांपैकी एका पेक्षा अधिक आदेशांद्वारे अनुतोष मिळवण्यासाठी अर्ज करण्याच्या तिच्या हक्काबाबत ;

(ख) सेवा प्रदात्यांच्या सेवांच्या उपलब्धतेबाबत ;

(ग) संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवांच्या उपलब्धतेबाबत ;

(घ) विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ अन्वये मोफत विधिविषयक सेवा मिळवण्याच्या तिच्या हक्कांबाबत ; १९८७ चा ३९.

(ङ) जेथे जेथे उचित असेल तेथे, भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ क अन्वये तक्रार दाखल करण्याच्या तिच्या हक्काबाबत, १८६० चा ४५.

माहिती देईल :

परंतु असे की, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा कोणत्याही प्रकारे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही की, पोलीस अधिकाऱ्यास दखलपात्र अपराध केल्याची माहिती मिळाल्यानंतर, कायद्याला अनुसरून कार्यवाही करण्याबाबतच्या त्याच्या कर्तव्यांपासून त्याची सुटका होते.

आश्रय गृहाची कर्तव्ये.

६. जर पीडित व्यक्ती किंवा तिच्यावतीने, संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता याने आश्रय गृहाच्या प्रभारी असणाऱ्या व्यक्तीकडे पीडित व्यक्तीस आश्रय देण्याची विनंती केली तर, आश्रय गृहाची अशी प्रभारी व्यक्ती, आश्रय गृहात त्या पीडित व्यक्तीस आश्रय उपलब्ध करून देईल.

वैद्यकीय सुविधा केंद्राची कर्तव्ये.

७. जर पीडित व्यक्ती किंवा तिच्यावतीने, संरक्षण अधिकारी किंवा सेवा प्रदाता याने, वैद्यकीय सुविधा केंद्राच्या प्रभारी व्यक्तीकडे, तिला कोणतेही वैद्यकीय साहाय्य पुरवण्याची विनंती केली तर, वैद्यकीय सुविधा केंद्राची प्रभारी व्यक्ती, त्या पीडित व्यक्तीस वैद्यकीय सुविधा केंद्रात वैद्यकीय साहाय्य उपलब्ध करून देईल.

संरक्षण अधिकाऱ्यांची नियुक्ती.

८. (१) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, प्रत्येक जिल्ह्यात, त्याला आवश्यक वाटतील तितक्या संरक्षण अधिकाऱ्यांची नियुक्ती करील आणि संरक्षण अधिकारी, त्याला या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर आणि कर्तव्यांचे पालन ज्या क्षेत्रामध्ये करील, असे क्षेत्र किंवा क्षेत्रे देखील अधिसूचित करील.

(२) संरक्षण अधिकारी या, शक्यतोवर महिला असतील आणि त्यांच्याकडे विहित करण्यात येतील अशा अर्हता आणि अनुभव असेल.

(३) संरक्षण अधिकारी आणि त्याला दुय्यम असलेले इतर अधिकारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि कार्ये.

९. (१) संरक्षण अधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) दंडाधिकाऱ्याला या अधिनियमाखालील, त्याची कार्ये पार पाडण्याच्या कामात साहाय्य करणे ;

(ख) कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार मिळाल्यानंतर, अशा कौटुंबिक घटनेचा अहवाल, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने दंडाधिकाऱ्याकडे पाठविणे आणि त्याच्या प्रती ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, कौटुंबिक हिंसाचार घडून आल्याचा आरोप करण्यात आला आहे, अशा क्षेत्रातील पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याकडे आणि त्या क्षेत्रातील सेवा प्रदात्यांकडे अग्रेषित करणे ;

(ग) जर पीडित व्यक्तीने संरक्षण आदेश काढण्यासाठी साहाय्य मागण्याची इच्छा व्यक्त केली असेल तर, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात व अशा रीतीने दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे ;

(घ) विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ अन्वये, पीडित व्यक्तीस, विधिविषयक साहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे, हे सुनिश्चित करणे आणि ज्या नमुन्यात तक्रार करावयाची आहे तो विहित नमुना विनामूल्य उपलब्ध करून देणे ; १९८७ चा ३९.

(ङ) दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारितेतील स्थानिक क्षेत्रांमध्ये विधि साहाय्य किंवा समुपदेशन, आश्रय गृहे आणि वैद्यकीय सुविधा पुरवणाऱ्या सर्व सेवा प्रदात्यांची यादी ठेवणे ;

(च) पीडित व्यक्तीस, तशी गरज भासल्यास, सुरक्षित आश्रय गृह उपलब्ध करून देणे आणि तिला आश्रय गृहात दाखल केल्याबाबतच्या अहवालाची प्रत आश्रय गृह ज्या क्षेत्रात असेल तेथे अधिकारिता असणाऱ्या पोलीस ठाण्याकडे आणि दंडाधिकाऱ्यांकडे अग्रेषित करणे ;

(छ) पीडित व्यक्तीस शारीरिक इजा झालेली असेल तर, तिची वैद्यकीय तपासणी करवून घेणे आणि कौटुंबिक हिंसाचार जेथे घडून आल्याचा आरोप करण्यात आला असेल अशा क्षेत्रात अधिकारिता असणारे पोलीस ठाणे आणि दंडाधिकारी यांना, त्या वैद्यकीय अहवालाची प्रत अग्रेषित करणे ;

१९७४ चा २. (ज) कलम २० खाली काढलेल्या आर्थिक अनुतोषाच्या आदेशाचे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, अनुपालन व अंमलबजावणी झाली असल्याचे सुनिश्चित करणे ;

(झ) विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(२) संरक्षण अधिकारी हा दंडाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली असेल आणि दंडाधिकारी व शासन यांनी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये, त्याच्यावर लादलेली कर्तव्ये तो पार पाडील.

**१०.** (१) यासंबंधात करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, विधिविषयक साहाय्य, वैद्यकीय, वित्तीय किंवा इतर साहाय्य पुरवणे यांसह कोणत्याही कायदेशीर साधनांनी महिलांच्या हक्कांचे आणि हितसंबंधाचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवणारा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेला कोणताही स्वयंसेवी अधिसंघ, किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेली कंपनी, यांना राज्य शासनाकडे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, स्वतःची सेवा प्रदाता म्हणून नोंदणी करून घेता येईल. **सेवा प्रदाने.**

१८६० चा २१.
१९५६ चा १.

(२) पोटकलम (१) अन्वये नोंदणी केलेल्या सेवा प्रदात्याला पुढील अधिकार असतील—

(क) जर पीडित व्यक्तीची तशी इच्छा असेल तर कौटुंबिक घटनेचा अहवाल विहित नमुन्यात नोंदवणे आणि त्याची प्रत, कौटुंबिक हिंसाचार जेथे घडला असेल अशा क्षेत्रात अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्याकडे आणि संरक्षण अधिकाऱ्याकडे अग्रेषित करणे ;

(ख) पीडित व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करून घेणे आणि वैद्यकीय अहवालाची प्रत कौटुंबिक हिंसाचार ज्याच्या स्थानिक सीमांमध्ये घडला असेल अशा संरक्षण अधिकाऱ्याकडे आणि पोलीस ठाण्याकडे अग्रेषित करणे ;

(ग) जर पीडित व्यक्तीला आश्रय गृहात आश्रय घेण्याची गरज भासली तर तिला तसा आश्रय देण्यात आल्याबाबतची सुनिश्चिती करणे आणि पीडित व्यक्तीस आश्रय गृहात दाखल केल्याचा अहवाल, कौटुंबिक हिंसाचार ज्याच्या स्थानिक सीमांमध्ये घडला असेल अशा पोलीस ठाण्याकडे अग्रेषित करणे ;

(३) कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने या अधिनियमाअन्वये, अधिकारांचा वापर करताना किंवा कर्तव्ये पार पाडताना, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी या अधिनियमाअन्वये काम करणाऱ्या किंवा काम करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही सेवा प्रदात्यावर किंवा सेवा प्रदात्याच्या कोणत्याही सदस्यावर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**११.** केंद्र सरकार आणि प्रत्येक राज्य शासन, पुढील गोष्टी सुनिश्चित करण्यासाठी सर्व उपाययोजना करील— **शासनाची कर्तव्ये.**

(क) या अधिनियमातील तरतुदींना, दूरचित्रवाणी, आकाशवाणी आणि वृत्तपत्रे यांसह सार्वजनिक प्रसार माध्यमांद्वारे नियमित कालांतराने व्यापक प्रसिद्धी दिली जात आहे ;

(ख) या अधिनियमात मांडण्यात आलेल्या मुद्यांवर पोलीस अधिकाऱ्यांसह, केंद्र सरकारचे आणि राज्य शासनाचे अधिकारी आणि न्यायिक सेवांचे सदस्य यांना, संवेदनशीलता व जागृती निर्माण करणारे नियतकालिक प्रशिक्षण दिले जात आहे ;

(ग) कौटुंबिक हिंसाचाराबाबतचे मुद्दे मांडण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था, आरोग्य आणि मानवी संसाधने यांसह, विधि व गृह व्यवहारविषयक कामकाज पाहणाऱ्या संबंधित मंत्रालयांमार्फत आणि विभागांमार्फत पुरवल्या जाणाऱ्या सेवांमध्ये प्रभावी समन्वय प्रस्थापित केला जात आहे, आणि त्याचे नियतकालिक पुनर्विलोकन केले जात आहे ;

(घ) या अधिनियमाअन्वये, महिलांना सेवा पुरवण्याशी संबंधित असलेल्या निरनिराळ्या मंत्रालयांसाठी तसेच न्यायालयासाठीही संहिता तयार करून ती रूढ करण्यात आली आहे.

## प्रकरण चार

## अनुतोषाबाबतचे आदेश प्राप्त करण्याची कार्यपद्धती

दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे.

**१२.** (१) या अधिनियमाअन्वये एका किंवा अधिक अनुतोषांची मागणी करण्याकरिता पीडित व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पीडित व्यक्तीच्या वतीने इतर कोणतीही व्यक्ती, यांना दंडाधिकाऱ्याकडे अर्ज सादर करता येईल:

परंतु असे की, अशा अर्जावर कोणताही आदेश काढण्यापूर्वी, दंडाधिकारी, त्याला संरक्षण अधिकाऱ्याकडून किंवा सेवा प्रदात्याकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल विचारात घेईल.

(२) पोट-कलम (१) खाली मागणी केलेल्या अनुतोषात, उत्तरवादीकडून केल्या गेलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या कृतीमुळे झालेल्या इजांच्या नुकसानभरपाईसाठी किंवा नुकसानीसाठी दावा दाखल करण्याच्या त्या व्यक्तीच्या हक्कास बाध न येऊ देता, नुकसानभरपाईच्या किंवा नुकसानीच्या प्रदानाचा आदेश देण्याबाबतच्या अनुतोषाचा समावेश होऊ शकेल:

परंतु असे की, पीडित व्यक्तीच्या बाजूने कोणत्याही न्यायालयाद्वारे, नुकसानभरपाई किंवा नुकसानी म्हणून, कोणत्याही रकमेसाठी हुकूमनामा काढला असल्यास, या अधिनियमाअन्वये दंडाधिकाऱ्याने केलेल्या आदेशाला अनुसरून दिलेली किंवा देय असलेली अशी कोणतीही रक्कम असल्यास ती, अशा हुकूमनाम्यानुसार देय असलेल्या रकमेतून वजा केली जाईल आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यांमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तो हुकूमनामा, अशा वजावटीनंतर कोणतीही रक्कम शिल्लक असल्यास त्यासाठी अंमलबजावणीयोग्य असेल. १९०८ चा ५.

(३) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेला प्रत्येक अर्ज हा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि त्यामध्ये असे तपशील समाविष्ट केलेले असतील किंवा तो त्याच्याशी शक्य तितके साधर्म्य असणारा असेल.

(४) दंडाधिकारी, न्यायालयाला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून सर्वसाधारणपणे तीन दिवसांच्या पलीकडचा नसेल असा दिनांक, सुनावणीचा पहिला दिनांक म्हणून निश्चित करील.

(५) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेला प्रत्येक अर्ज, त्याच्या पहिल्या सुनावणीच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत निकालात काढण्यासाठी, दंडाधिकारी, प्रयत्नांची शिकस्त करील.

नोटीस बजावणे.

**१३.** (१) कलम १२ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या सुनावणीच्या दिनांकाची नोटीस, अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त दोन दिवसांत किंवा दंडाधिकारी मान्य करील अशा, त्यापुढील योग्य कालावधीत, दंडाधिकाऱ्याकडून संरक्षण अधिकाऱ्याला देण्यात येईल आणि तो, ती नोटीस विहित केलेल्या मार्गांनी उत्तरवादीवर आणि दंडाधिकाऱ्यानी निदेशित केल्याप्रमाणे इतर कोणत्याही व्यक्तीवर बजावील.

(२) संरक्षण अधिकाऱ्याने नोटीस बजावल्याबाबत विहित नमुन्यात केलेले अभिकथन हाच, एतद्विरूद्ध शाबीत न झाल्यास, उत्तरवादीवर आणि दंडाधिकाऱ्याने निदेशित केल्याप्रमाणे इतर कोणत्याही व्यक्तीवर, अशी नोटीस बजावली गेल्याचा पुरावा असेल.

समुपदेशन.

**१४.** (१) या अधिनियमाखालील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दंडाधिकारी, उत्तरवादीला किंवा पीडित व्यक्तीला, समुपदेशनाची विहित अर्हता आणि अनुभव असलेल्या सेवा प्रदाता केंद्राच्या कोणत्याही सदस्याबरोबर, एकट्याने किंवा संयुक्तपणे समुपदेशन घेण्याचे निदेश देऊ शकेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, जेथे दंडाधिकाऱ्याने कोणताही निदेश दिला असेल तेथे, तो, प्रकरणाच्या सुनावणीसाठी दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीतील पुढील दिनांक निश्चित करील.

कल्याण कार्यातील तज्ज्ञ व्यक्तींचे साहाय्य.

**१५.** या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, दंडाधिकाऱ्याला, त्याची कार्ये पार पाडण्यात त्यास साहाय्य करण्याच्या प्रयोजनासाठी, त्याला योग्य वाटेल अशा एखाद्या, प्राधान्याने महिला असलेल्या व्यक्तीच्या—मग ती व्यक्ती पीडित व्यक्तीच्या नातेसंबंधात असो अगर नसो—तसेच, कुटुंब कल्याणाला चालना देण्याचे कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या सेवा घेता येतील.

कार्यवाही कक्षांतर्गत करणे.

**१६.** प्रकरणाच्या परिस्थितीनुसार, तसे करणे आवश्यक असल्याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री पटली असेल आणि कार्यवाहीमधील दोहोंपैकी एका पक्षाची तशी इच्छा असेल तर, त्याला, या अधिनियमाखालील कार्यवाही, कक्षांतर्गत करता येईल.

१७. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कौटुंबिक नातेसंबंधातील प्रत्येक महिलेला सामाईक घरात राहण्याचा हक्क असेल-मग त्यामध्ये तिचा कोणताही हक्क, मालकीहक्क किंवा लाभकारी हितसंबंध असो वा नसो. सामाईक घरात राहण्याचा हक्क.

(२) उत्तरवादीकडून, कोणत्याही पीडित व्यक्तीला, कायद्याने घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, सामाईक घरामधून किंवा त्याच्या कोणत्याही भागामधून बेदखल केले जाणार नाही किंवा काढून टाकले जाणार नाही.

१८. दंडाधिकाऱ्याला, पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यावर आणि कौटुंबिक हिंसाचार घडला आहे किंवा घडण्याचा संभव आहे याबाबत सकृतदर्शनी खात्री पटल्यावर, पीडित व्यक्तीच्या बाजूने संरक्षण आदेश काढता येईल आणि उत्तरवादीस पुढील गोष्टी करण्यास मनाई करता येईल,— संरक्षण आदेश.

(क) कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करणे ;

(ख) कौटुंबिक हिंसाचाराची कृत्ये करण्यास मदत करणे वा त्यास अपप्रेरणा देणे ;

(ग) पीडित व्यक्तीच्या नोकरीच्या जागी किंवा ती वारंवार ज्या जागेला भेट देते अशा इतर कोणत्याही जागी किंवा पीडित व्यक्ती जर मूल असेल तर त्याच्या शाळेमध्ये प्रवेश करणे ;

(घ) पीडित व्यक्तीशी, वैयक्तिक, मौखिक किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे अथवा दूरध्वनीद्वारे संपर्क करण्यासह, कोणत्याही स्वरूपाचा संवाद साधण्याचा प्रयत्न करणे ;

(ङ) दंडाधिकाऱ्याच्या संमतीशिवाय दोन्ही पक्षांनी, म्हणजे पीडित व्यक्ती आणि उत्तरवादी यांनी संयुक्तपणे किंवा उत्तरवादीने एकट्याने वापरलेल्या, धारण केलेल्या किंवा उपभोगलेल्या कोणत्याही मत्तांचे अन्यसंक्रामण करणे, बँक लॉकर्स किंवा बँक खाती वापरणे ; यामध्ये तिचे स्त्रीधन किंवा पक्षकारांनी संयुक्तपणे वा स्वतंत्रपणे धारण केलेली अन्य कोणतीही मालमत्ता यांचा समावेश होतो ;

(च) पीडित व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती, इतर नातलग किंवा तिला कौटुंबिक हिंसाचारापासून वाचवणारी कोणतीही व्यक्ती, यांना हिंसक वागणूक देणे ;

(छ) संरक्षण आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेले अन्य कोणतेही कृत्य करणे.

१९. (१) कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज निकालात काढताना, दंडाधिकाऱ्याला, कौटुंबिक हिंसाचार घडला असल्याची खात्री पटल्यानंतर, पुढील स्वरूपाचा निवासाबाबतचा आदेश देता येईल :— निवासाबाबतचे आदेश.

(क) पीडित व्यक्तीचा सामाईक घरामधून कब्जा काढून घेणे किंवा अन्य कोणत्याही रीतीने तिच्या कब्जाला बाधा आणणे यापासून उत्तरवादीला प्रतिबंध करणारा आदेश- मग उत्तरवादीचे सामाईक घरामध्ये कायदेशीर किंवा समन्याय हितसंबंध असो वा नसो ;

(ख) उत्तरवादीला त्याने स्वतः सामाईक घरामधून निघून जावे असे निदेश देणारा आदेश;

(ग) पीडित व्यक्ती जेथे राहत असेल त्या सामाईक घराच्या कोणत्याही भागामध्ये प्रवेश करण्यास उत्तरवादीस किंवा त्याच्या कोणत्याही नातेवाईकास प्रतिबंध करणारा आदेश ;

(घ) सामाईक घराचे अन्यसंक्रामण करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे किंवा त्यावर भार निर्माण करणे यांपासून उत्तरवादीस प्रतिबंध करणारा आदेश ;

(ङ) उत्तरवादीला, दंडाधिकाऱ्याच्या संमतीशिवाय सामाईक घरावरील त्याचे हक्क सोडण्यास प्रतिबंध करणारा आदेश ; किंवा

(च) पीडित व्यक्तीला राहण्यासाठी सामाईक घरात होती त्याच दर्जाची पर्यायी निवासी जागा मिळवून देण्याचा किंवा परिस्थितीनुसार तसे आवश्यक असेल तर, अशा जागेचे भाडे देण्याचा उत्तरवादीला निदेश देणारा आदेश :

परंतु असे की, महिला असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध खंड (ख) अन्वये, कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(२) पीडित व्यक्ती किंवा अशा पीडित व्यक्तीचे कोणतेही मूल यांच्या संरक्षणासाठी, किंवा त्यांच्या सुरक्षिततेची तरतूद करण्यासाठी, दंडाधिकाऱ्यास, त्याला वाजवीरीत्या आवश्यक वाटतील अशा अतिरिक्त शर्ती लादता येतील किंवा अन्य कोणताही निदेश देता येईल.

(३) दंडाधिकाऱ्यास, कौटुंबिक हिंसाचार करण्यास प्रतिबंध करण्यासाठी, जामीनदारांसह किंवा जामीनदारांशिवाय बंधपत्र निष्पादित करण्यास उत्तरवादीला फर्मावता येईल.

(४) पोट-कलम (३) खालील आदेश हा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण आठ अन्वये काढण्यात आलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. १९७४ चा २.

(५) पोट-कलम (१), पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) अन्वये आदेश देताना न्यायालयास, पीडित व्यक्तीला संरक्षण देण्यासाठी किंवा आदेशाची अंमलबजावणी करण्यामध्ये तिला किंवा तिच्या वतीने अर्ज करणाऱ्या व्यक्तीला साहाय्य करण्यासाठी नजीकच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास निदेश देणारा आदेश देखील देता येईल.

(६) पोट-कलम (१) अन्वये आदेश देताना, दंडाधिकाऱ्यास, पक्षकारांच्या आर्थिक गरजा व साधनसंपत्ती लक्षात घेऊन, भाडे आणि अन्य प्रदाने चुकती करण्यासंबंधात उत्तरवादीवर आबंधने लादता येतील.

(७) ज्या पोलीस ठाण्याच्या अधिकारितेत दंडाधिकाऱ्याकडे दाद मागण्यात आली आहे त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास दंडाधिकारी, संरक्षण आदेशाच्या अंमलबजावणीमध्ये साहाय्य करण्याचा निदेश देऊ शकेल.

(८) दंडाधिकाऱ्याला, पीडित व्यक्तीचे स्त्रीधन किंवा ती ज्यास हक्कदार असेल अशी अन्य कोणतीही मालमत्ता किंवा मौल्यवान दस्तऐवज तिच्या ताब्यात परत करण्याचा, उत्तरवादीस निदेश देता येईल.

आर्थिक अनुतोष.

**२०.** (१) कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये अर्ज निकालात काढताना, दंडाधिकाऱ्यास पीडित व्यक्ती आणि पीडित व्यक्तीचे कोणतेही मूल यांना कौटुंबिक हिंसाचाराच्या परिणामी करावा लागलेला खर्च व झालेले नुकसान यांची भरपाई करण्याकरिता आर्थिक अनुतोष देण्याचा उत्तरवादीला निदेश देता येईल आणि अशा अनुतोषामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल, परंतु तो तेवढ्यापुरताच मर्यादित असणार नाही—

(क) मिळकतीची झालेली हानी ;

(ख) वैद्यकीय खर्च ;

(ग) पीडित व्यक्तीच्या नियंत्रणातील कोणत्याही मालमत्तेची नासधूस, नुकसान किंवा ती काढून घेण्यामुळे झालेली हानी; आणि

(घ) पीडित व्यक्तीसाठी किंवा तिला मुले असल्यास, त्यांच्यासाठी पोटगी तसेच, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १२५ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये दिलेला पोटगीचा आदेश किंवा त्या पोटगीच्या आदेशाबरोबरच आणखी देण्यात आलेला एखादा आदेश. १९७४ चा २.

(२) या कलमान्वये मंजूर केलेला आर्थिक अनुतोष हा, समुचित, रास्त आणि वाजवी असेल आणि पीडित व्यक्तीला ज्या राहणीमानाची सवय असेल त्या राहणीमानाशी तो सुसंगत असेल.

(३) दंडाधिकाऱ्यास, प्रकरणाचे स्वरूप व परिस्थिती यानुसार आवश्यक असेल अशी गरज लक्षात घेऊन, पोटगीची समुचित ठोक रक्कम किंवा मासिक रक्कम देण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार असेल.

(४) दंडाधिकारी, पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आर्थिक अनुतोषाबाबतच्या आदेशाची एक प्रत अर्जाच्या पक्षकारांना आणि उत्तरवादी ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहत असेल त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास पाठवील.

(५) पीडित व्यक्तीस मंजूर केलेला आर्थिक अनुतोष, उत्तरवादी, पोट-कलम (१) अन्वये, देण्यात आलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत देईल.

(६) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशातील अटींनुसार रक्कम देण्यास उत्तरवादीने कसूर केल्यास, दंडाधिकारी, उत्तरवादीच्या नियोक्त्यास किंवा त्याच्या ऋणकोस, उत्तरवादीस देय असलेल्या मजुरीचा वा वेतनाचा किंवा त्याच्या खाती उपार्जित होणाऱ्या ऋणाचा भाग थेट पीडित व्यक्तीस देण्याचा किंवा न्यायालयाकडे जमा करण्याचा निदेश देऊ शकेल आणि ही रक्कम उत्तरवादीकडून देय असलेल्या आर्थिक अनुतोषापोटी समायोजित करता येईल.

ताबा देण्याबाबतचा आदेश.

**२१.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, दंडाधिकाऱ्याला, या अधिनियमान्वये संरक्षण आदेशासाठी किंवा अन्य कोणत्याही अनुतोषासाठी केलेल्या अर्जाची सुनावणी करण्याच्या कोणत्याही टप्प्यात, पीडित व्यक्तीला किंवा तिच्या वतीने अर्ज करणाऱ्या व्यक्तीला कोणतेही मूल किंवा मुले यांचा तात्पुरता ताबा देता येईल आणि आवश्यकता असल्यास, उत्तरवादीने अशा मुलाला किंवा मुलांना भेटण्याची व्यवस्था विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु असे की, जर उत्तरवादीची कोणतीही भेट मुलाच्या किंवा मुलांच्या हितास हानिकारक होईल असे दंडधिकाऱ्याचे मत असेल तर, दंडाधिकारी अशा भेटीची परवानगी नाकारील.

**२२.** या अधिनियमाअन्वये मंजूर करण्यात येईल अशा अन्य अनुतोषांबरोबरच, दंडाधिकारी, पीडित व्यक्तीने अर्ज केल्यावरून, त्या उत्तरवादीने केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या कृत्यामुळे झालेली इजा तसेच मानसिक छळ, भावनिक क्लेश यांसाठी नुकसानभरपाई आणि नुकसानी देण्याचा उत्तरवादीला निदेश देणारा आदेशही देऊ शकेल. नुकसानभरपाईचा आदेश.

**२३.** (१) दंडाधिकारी, या अधिनियमाखालील, त्याच्यापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये त्याला न्याय्य व योग्य वाटेल असा अंतरिम आदेश देऊ शकेल. अंतरिम व एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार.

(२) उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करीत आहे किंवा त्याने ते केले आहे किंवा उत्तरवादीकडून कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य घडणे संभाव्य आहे असे अर्जावरून सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, त्याला पीडित व्यक्तीने, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात केलेल्या शपथपत्राच्या आधारावर, कलम १८, कलम १९, कलम २०, कलम २१ किंवा, यथास्थिति, कलम २२ अन्वये उत्तरवादीविरुद्ध एकतर्फी आदेश देता येईल.

**२४.** दंडाधिकारी, या अधिनियमाअन्वये त्याने कोणताही आदेश दिला असेल अशा सर्व प्रकरणांमध्ये, अशा आदेशाची प्रत अर्जाच्या पक्षकारांना, ज्याच्या अधिकारितेत दंडाधिकाऱ्याकडे दाद मागितली असेल अशा पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याला आणि न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये जर कोणताही सेवा प्रदाता स्थित असेल आणि जर एखाद्या सेवा प्रदात्याने कौटुंबिक घटनेचा अहवाल नोंदवला असेल, तर त्या सेवा प्रदात्याला, विनामूल्य देण्याचा आदेश देईल. न्यायालयाने आदेशाच्या प्रती विनामूल्य देणे.

**२५.** (१) कलम १८ अन्वये दिलेला संरक्षण आदेश, पीडित व्यक्ती ते संरक्षण काढून टाकण्यासाठी अर्ज करीपर्यंत, अंमलात राहील. आदेशाचा कालावधी व त्यातील फेरफार.

(२) या अधिनियमाअन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशात फेरफार करण्याची, सुधारणा करण्याची किंवा तो रद्द करण्याची आवश्यकता ज्यामुळे निर्माण व्हावी अशा रीतीने परिस्थितीत बदल झाला असल्याबाबत, पीडित व्यक्तीने वा उत्तरवादीने केलेल्या अर्जावरून दंडाधिकाऱ्याची खात्री पटली तर, तो कारणे लेखी नमूद करून त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

**२६.** (१) कलमे १८, १९, २०, २१ व २२ अन्वये उपलब्ध असलेल्या कोणत्याही अनुतोषाची दिवाणी न्यायालय, कुटुंब न्यायालय, किंवा फौजदारी न्यायालय यांच्यापुढील, पीडित व्यक्तीस व उत्तरवादीस बाधा पोचविणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत देखील मागणी करता येईल, मग अशी कार्यवाही त्या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी सुरू झालेली असो वा त्यानंतर सुरू झालेली असो. अन्य दाव्यांमध्ये आणि कायदेशीर कार्यवाहीमध्ये अनुतोष.

(२) पीडित व्यक्ती, दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयापुढील दाव्यामध्ये किंवा कायदेशीर कार्यवाहीमध्ये ज्याची मागणी करू शकेल अशा कोणत्याही इतर अनुतोषाशिवाय व त्यासह पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अनुतोषाची मागणी करू शकेल.

(३) या अधिनियमाअन्वये केलेल्या कार्यवाहीखेरीज अन्य कोणत्याही कार्यवाहीमध्ये पीडित व्यक्तीला कोणताही अनुतोष मिळाला असेल अशा प्रकरणात, ती व्यक्ती, असा अनुतोष दिल्याबाबत दंडाधिकाऱ्याला माहिती देण्यास बांधील असेल.

**२७.** (१) ज्यांच्या स्थानिक सीमांच्या आत— अधिकारिता.

(क) पीडित व्यक्ती कायमस्वरूपी किंवा तात्पुरती राहत असेल किंवा व्यवसाय करीत असेल किंवा कामावर नेमलेली असेल ; किंवा

(ख) जेथे उत्तरवादी राहत असेल किंवा व्यवसाय करीत असेल किंवा कामावर नेमलेला असेल ; किंवा

(ग) जेथे वादकारण घडले असेल,

ते, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालय किंवा, यथास्थिति, महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, या अधिनियमाअन्वये संरक्षण आदेश किंवा अन्य आदेश देण्यास आणि या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यास सक्षम न्यायालय असेल.

(२) या अधिनियमान्वये काढलेला कोणताही आदेश संपूर्ण भारतात अंमलात आणण्यायोग्य असेल.

कार्यपद्धती. **२८.** (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करून, कलमे १२, १८, १९, २०, २१, २२ व २३ अन्वये करावयाच्या सर्व कार्यवाहीचे आणि कलम ३१ खालील अपराधांचे नियमन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदींद्वारे करण्यात येईल. १९७४ चा २.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, न्यायालयाला कलम १२ अन्वये किंवा कलम २३ च्या पोट-कलम (२) अन्वये त्याच्याकडे करण्यात आलेला अर्ज निकाली काढण्याकरिता आपली स्वतःची कार्यपद्धती निर्धारित करण्यास प्रतिबंध होणार नाही.

अपील. **२९.** दंडाधिकाऱ्याने काढलेला आदेश पीडित व्यक्तीवर किंवा, यथास्थिति, उत्तरवादीवर ज्या दिनांकास बजावण्यात आला त्यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सत्र न्यायालयाकडे अपील करता येईल.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

**संरक्षण अधिकारी व सेवा प्रदात्यांचे सदस्य हे लोकसेवक असणे.** **३०.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याहो नियमांच्या किंवा आदेशांच्या कोणत्याही तरतुदीनुसार कृती करणारे किंवा करण्याचे अभिप्रेत असणारे संरक्षण अधिकारी व सेवा प्रदात्यांचे सदस्य हे भारतीय दंड संहिता याच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील. १८६० चा ४५.

**उत्तरवादीने संरक्षण आदेशाचा भंग केल्यास त्यासाठी शास्ती.** **३१.** (१) उत्तरवादीने संरक्षण आदेशाचा किंवा अंतरिम संरक्षण आदेशाचा भंग करणे हा या अधिनियमाअन्वये अपराध असेल आणि त्यासाठी तो एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही स्वरूपाच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) पोट-कलम (१) खालील अपराधाची न्यायचौकशी ही, व्यवहार्य असेल तेथवर, आरोपीने ज्या आदेशाचा भंग केल्याचे अभिकथित करण्यात आले असेल, तो आदेश देणाऱ्या दंडाधिकाऱ्याकडून केली जाईल.

(३) पोट-कलम (१) खालील दोषारोप निश्चित करताना, दंडाधिकाऱ्यास, भारतीय दंड संहितेचे कलम ४९८क किंवा त्या संहितेची किंवा, यथास्थिति, हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१ याची अन्य कोणतीही तरतूद यांखालील कोणताही अपराध केल्याचे वस्तुस्थितीवरून आढळून आल्यास त्या तरतुदींन्वये दोषारोप निश्चित करता येतील. १८६० चा ४५. १९६१ चा २८.

**दखल व शाबिती.** **३२.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरीही, कलम ३१ च्या पोट-कलम (१) खालील अपराध हा दखलपात्र व जामीनास अपात्र असेल. १९७४ चा २.

(२) न्यायालयास, आरोपीने कलम ३१ च्या पोट-कलम (१) खालील अपराध केला असल्याचा निष्कर्ष, पीडित व्यक्तीच्या एकमात्र साक्षीवरून काढता येईल.

**संरक्षण अधिकाऱ्याने कर्तव्याचे पालन न केल्याबद्दल शास्ती.** **३३.** जर कोणत्याही संरक्षण अधिकाऱ्याने, संरक्षण आदेशामध्ये दंडाधिकाऱ्याने दिलेल्या निदेशानुसार कर्तव्याचे पालन करण्यात, कोणत्याही पुरेशा कारणाशिवाय कसूर केली किंवा नकार दिला तर, तो एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही स्वरूपाच्या कारावासाच्या किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**संरक्षण अधिकाऱ्याने केलेल्या अपराधाची दखल.** **३४.** राज्य शासनाच्या किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने तक्रार दाखल केलेली असल्याखेरीज, संरक्षण अधिकाऱ्याविरुद्ध खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.** **३५.** या अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा आदेशान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल संरक्षण अधिकाऱ्याविरुद्ध दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याला न्यूनत्व आणणार नाही.** **३६.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींव्यतिरिक्त असतील आणि त्यांना न्यूनत्व आणणाऱ्या नसतील.

**केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.** **३७.** (१) केंद्र सरकारला या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ८ च्या पोट-कलम (२) अन्वये संरक्षण अधिकारी धारण करील अशा अर्हता व अनुभव ;

(ख) कलम ८ च्या पोट-कलम (३) अन्वये संरक्षण अधिकारी व त्याचे अन्य दुय्यम अधिकारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ग) कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये कौटुंबिक घटनेचा अहवाल ज्या नमुन्यात व ज्या रीतीने करता येईल तो नमुना व ती रीत ;

(घ) कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये दंडाधिकाऱ्याकडे संरक्षण आदेशासाठी ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करता येईल तो नमुना व ती रीत ;

(ङ) कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) अन्वये ज्या नमुन्यात तक्रार करता येईल तो नमुना ;

(च) कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (झ) अन्वये संरक्षण अधिकाऱ्याने पार पाडावयाची अन्य कर्तव्ये ;

(छ) कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये सेवा प्रदात्यांच्या नोंदणीचे विनियमन करणारे नियम ;

(ज) या अधिनियमाअन्वये अनुतोष मागण्यासाठी कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या नमुन्यामध्ये अर्ज करता येईल तो नमुना आणि त्या कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये अशा अर्जामध्ये ज्यांचा अंतर्भाव करता येईल असे तपशील ;

(झ) कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्याचे मार्ग ;

(ञ) कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये संरक्षण अधिकाऱ्याने करावयाच्या नोटीस बजावण्याच्या घोषणेचा नमुना ;

(ट) कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये सेवा प्रदात्याचा सदस्य समुपदेशनातील जी अर्हता व अनुभव धारण करील ती अर्हता व अनुभव ;

(ठ) कलम २३ च्या पोट-कलम (२) अन्वये पीडित व्यक्तीस ज्या नमुन्यात शपथपत्र दाखल करता येईल तो नमुना ;

(ड) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.